# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः02.08.2024** **वारःशुक्रवार**

---

1. नवी दिल्ली इथं आजपासून राज्यपालांची दोन दिवसीय परिषद,
2. अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गात आणखी उपवर्गवारी देण्यास सर्वोच्च न्यायालयाची अनुकूलता
3. नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी सीबीआय कडून आरोपपत्र दाखल
4. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत नेमबाज स्वप्नील कुसाळेला कास्यपदक; महाराष्ट्र सरकारकडून 1 कोटींच बक्षीस तर मध्य रेलवेकडून पदोन्नती जाहीर आणि
5. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात अतिवृष्टीमुळे हाहाकार; केदारनाथ यात्रा स्थगित

**<u>राज्यपाल परिषद</u>**

देशातील सर्व राज्यांच्या राज्यपालांच्या दोन दिवसांच्या परिषदेचं आयोजन राष्ट्रपती भवनात करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या परिषदेचं अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली होणारी ही पहिलीच परिषद आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा तसंच धर्मेंद्र प्रधान, शिवराजसिंह चौहान, अश्विनी वैष्णव आणि मनसुख मांडविय यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री देखील या परिषदेत सहभागी होणार आहेत. नीती आयोगाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तसंच पंतप्रधान कार्यालय आणि गृह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारीही या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. तीन नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी, उच्च शिक्षणातील सुधारणा, विद्यापीठांची मान्यता, आणि विविध क्षेत्रांच्या विकासावर प्राधान्यानं चर्चा अपेक्षित आहे.

**<u>सर्वोच्च न्यायालय आरक्षण</u>**

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षणामध्ये उप-वर्गीकरण आणि त्यातच स्वतंत्र कोटा मंजूर करण्यास सर्वोच्च न्यायालयाने काल अनुकूलता दर्शवली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने 6 विरुद्ध 1 अशा बहुमताने निकाल दिला. त्याचबरोबर, आरक्षणाचा लाभ वाढवण्यासाठी अनुसूचित जाती आणि जमातीच्या राखीव प्रवर्गांचे त्यांच्या मागासलेपणाच्या आधारे विविध गटांमध्ये उप-वर्गीकरण करण्याचा अधिकार राज्यांना दिला आहे. उप-वर्गीकरणाला परवानगी देताना, राज्य सरकार, उप-वर्गासाठी 100 टक्के आरक्षण ठेवू शकत नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. अनुसूचित जाती आणि जमातींमध्येही आर्थिक आणि सामाजिक स्तरांमधे प्रचंड विविधता असून त्यामुळे सर्व प्रकारच्या मागास वर्गांना एकाच गटात आरक्षण देणं योग्य नाही असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी निकालात म्हटलं आहे. त्याचं प्रमाण ठरवण्याचा अधिकार राज्य सरकारांना असून शिक्षण आणि नोकरीत अशा प्रकारचं आरक्षण त्यांना देता येईल, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

**<u>संसद</u>**

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी काल आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक 2024 लोकसभेत सादर केलं. या विधेयकानुसार 2005 च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यात बदल करून राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांची कार्यपद्धती बळकट करण्यात येणार आहे. देशात रेल्वे अपघाताच्या घटना रोखण्यासाठी सरकार वचनबद्ध असून, यूपीए

सरकारच्या काळाच्या तुलनेत रेल्वे अपघातांची संख्या 68 टक्के कमी झाल्याचं सरकारनं स्पष्ट केलं. रेल्वे मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागणीवर काल लोकसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली.

**<u>लोकसभा-शिक्षण</u>**

लोकसभेत काल शिक्षण मंत्रालयाशी संबंधित अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा झाली. शिक्षण क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात करण्यात येणाऱ्या तरतुदीत गेल्या काही वर्षांत वाढ झाली असल्याचं शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं. गेल्या 10 वर्षात देशाच्या शिक्षण क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा आणि दर्जामध्ये लक्षणीय सुधारणा झाल्याचं भाजपाचे तेजस्वी सूर्या यांनी चर्चेला सुरुवात करताना सांगितलं. काँग्रेसचे मोहम्मद जावेद यांनी शाळा आणि महाविद्यालयांमधल्या रिक्त पदांचा मुद्दा उपस्थित केला. तर, हुशार विद्यार्थ्यांना परदेशात जाण्यापासून रोखण्यासाठी उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारला पाहिजे असं तृणमूल काँग्रेसचे सौगाता रॉय म्हणाले. गेल्या वर्षी 8 लाख 96 हजार भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात गेल्याचं नमूद करत, विद्यार्थ्यांचा परदेशांत शिक्षण घेण्याची मानसिकता बदलण्याची गरज आल्याचं ते म्हणाले.

**<u>नीट-पेपर फूटी</u>**

बिहारमधील NEET-UG प्रवेश परीक्षा पेपरफूटी प्रकरणात, केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सी बी आय ने 13 आरोपींविरुद्ध पहिलं आरोपपत्र दाखल केलं आहे. पेपरफूटी घोटाळ्याचा सूत्रधार मनीष प्रकाश, सिकंदर यादव आणि अन्य 11 जणांविरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आतापर्यंत, या प्रकरणात 40 आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील इतर आरोपी आणि संशयितांविरुद्ध सीबीआय पुढील तपास करत असून इतर अनेक आरोपी आधीच पोलिस किंवा न्यायालयीन कोठडीत आहेत. या आरोपी आणि संशयितांविरुद्ध पुढील तपास पूर्ण झाल्यावर, नियुक्त न्यायालयात पुरवणी आरोपपत्र दाखल केले जाईल.

**<u>अभिवादन</u>**

थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या शतकोत्तर चौथ्या पुण्यतिथी निमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शतकोत्तर चौथ्या जयंती दिनानिमित्त काल महाराष्ट्रासह सर्वत्र त्यांना आदरांजली वाहण्यात आली. अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' देण्याची मागणी करण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी काल पुण्यात सांगितलं. या संदर्भात लवकरच पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचं ते म्हणाले. मातंग समाज समन्वय समितीनं आयोजित केलेल्या अभिवादन सोहळ्यामध्ये ते बोलत होते.

**<u>जपान प्रतिनिधी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संध्याकाळी जपानच्या प्रतिनिधी सभागृहाचे अध्यक्ष नुकागा फुकुशिरो आणि जपानी संसदेचं शिष्टमंडळ आणि व्यावसायिक नेत्यांची भेट घेतली. जपानकडून अधिक गुंतवणुकीसाठी आणि तंत्रज्ञानासाठी भारतात अनुकूल व्यावसायिक वातावरण तयार करणं आणि त्यासाठीच्या सुधारणांवर पंतप्रधानांनी भर दिला. या प्रयत्नांसाठी भेट देणाऱ्या शिष्टमंडळाला सरकारच्या पूर्ण सहकार्याची ग्वाही त्यांनी दिली.

**<u>पॅरिस ऑलिंपिक</u>**

महाराष्ट्रातल्या कोल्हापूर जिल्ह्यातल्या स्वप्निल कुसाळेनं काल पॅरिस ऑलिंपिकमध्ये पुरुषांच्या 50 मीटर एअर रायफल थ्री पोझिशन या प्रकारात कास्य पदकाला गवसणी घातली. पॅरिस ऑलिंपिकमधलं भारताला मिळालेलं नेमबाजीतलं हे तिसरं पदक आहे. स्वप्नीलने पुण्याच्या बालेवाडी इथल्या क्रीडा प्रबोधिनीमध्ये नेमबाजीचं प्रशिक्षण घेतलं आहे. खाशाबा जाधव यांच्यानंतर भारताला ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक मिळवून देणारा; स्वप्नील, हा महाराष्ट्रातला पहिला खेळाडू ठरला आहे. स्वप्नील कुसाळे याच्या यशाबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. या ऐतिहासिक कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचं पारितोषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलं.

**कुसाळे पदोन्नती**

दरम्यान, स्वप्नीलच्या या यशाबद्दल मध्य रेल्वेनं त्याला पदोन्नती दिली आहे. रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी काल या पदोन्नतीलामंजूरी दिली. पदोन्नतीनंतर आता स्वप्नील कुसाळे गट-क मधून गट ब मध्ये अधिकारी पदावर रुजू होणार आहे. स्वप्नील सध्या मध्य रेल्वेच्या पुणे विभागात तिकीट निरीक्षक पदावर कार्यरत आहे.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यात मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज कोलंबोमध्ये होणार आहे. श्रीलंकेविरुद्धच्या 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेत निर्भेळ यश मिळवल्यानंतर ही मालिकाही जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल. या मालिकेसाठी रोहित शर्माच्या भारतीय संघाचं नेतृत्व करणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी अडीच वाजतासामना सुरू होईल.

**बिहार-वीजमृत्यू**

बिहारमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या घटनांमध्ये, वीज पडल्यामुळे किमान 10 जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सर्वाधिक मृत्यू गया येथे झाले असून, जेहानाबादमध्ये तीन आणि रोहतास जिल्ह्यात दोन मृत्यू झाले आहेत. चालू खरीप हंगामात शेतात काम करणाऱ्या लोकांवर वीज पडल्याने बहुतांश मृत्यू झाले आहेत. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी या दुर्घटनामध्ये झालेल्या जीवितहानी बद्दल शोक व्यक्त केला आहे.

**वायनाड मृत्यू**

केरळमध्ये वायनाडमध्ये झालेल्या भूस्खलन दुर्घटनेतील मृतांची संख्या 274 वर पोहोचली असून, 187 जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर अद्याप 107 जण बेपत्ता आहेत. भूस्खलनग्रस्त भागातून आणखी कोणीही वाचण्याची अपेक्षा नाही असं लष्कराने काल राज्य सरकारला सांगितलं.

**पाऊस-उत्तराखंड, हिमाचल**

उत्तराखंडमधील टिहरी आणि रुद्रप्रयाग जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे केदारनाथ पायी यात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. राज्य तसंच राष्ट्रीय आपत्ति निवारण पथकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे; 2 हजारांहून अधिक भाविकांची सुटका करण्यात आली आहे, तर, अंदाजे 425 जणांना हवाई मार्गाने हलवण्यात आलं आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी काल या भागाची हवाई पाहणी केली तसंच बचाव शिबिरातील व्यवस्थेचा आढावा घेतला. पुढील 48 तासांत राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आल्याने सर्व यंत्रणांना सज्ज ठेवण्यात आलं आहे.

दरम्यान, हिमाचल प्रदेशातही विविध भागात मुसळधार पाऊस आणि ढगफुटीमुळे जीवित आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यात, आतापर्यंत एकंदर 55 लोक बेपत्ता असून 2 जणांचा मृत्यू झाला आहे. मलाणा येथील धरण फुटल्यामुळे आलेल्या पुरात धरणाच्या इमारतीत 4 जण अडकल्याची माहिती कुल्लूचे खासदार सुंदर ठाकूर यांनी दिली आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर कुल्लू-मनाली आणि मनाली-लेह मार्ग बंद ठेवण्यात आले आहेत.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.